# पदभरती निवेदन
## राष्ट्रीय आरोग्य अभियान
### उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर, माता कचेरी परीसर, श्रध्दानंद पेठ, दिक्षाभूमीजवळ, नागपूर या कार्यालयातंर्गत राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण क्रेंद्र, नागपूर या कार्यालयातील वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ व सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर या कार्यालयांतर्गत न्युट्रीशन ऑफिसर (पोषाहार तज्ञ) पोषाहार विभाग या रिक्त पदाची कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर पदभरती प्रक्रिया राबविण्यात येत आहेत.

सदरील पदभरती जाहिरात, पदांची संख्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, सामाजिक आरक्षण, नियुक्तीचे ठिकाण, अर्जाचा नमुना, नियम, अटी व शर्ती हया राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई येथील संकेतस्थळ (www.nrhm.maharashtra.gov.in& www.arogya.maharashtra.gov.in) वर प्रसिध्द करण्यात आलेले असून, उमेदवारांनी संकेतस्थळावरुन अर्जाचा नमुना Download करुन, जाहिरातीतील आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह अर्ज समक्ष अथवा रजिस्टर पोष्टाने अथवा कुरिअरने पाठविणेसाठी या निवेदनाव्दारे आवाहन करण्यात येत आहे.

उपसंचालक,आरोग्य सेवा,
नागपूर मंडळ,नागपूर.

# जाहिरात नमुना सन २०२३-२०२४

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यांत येणाऱ्या कार्यक्रमांसाठी खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे **कंत्राटी** पध्दतीने करार तत्वावर रिक्त पदे संवर्गनिहाय भरण्यासाठी खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

**उपसंचालक आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर**

| अ क्र | मंजुर पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | नियुक्तीचे ठिकाण | प्रवर्ग व पदसंख्या | शैक्षणिक पात्रता | वय मर्यादा | दरमहा एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०२ | राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र,अजनी रोड,नागपूर. | १) अ.जा. (SC)-१<br>२)इडब्ल्युएस (EWS) - १ | M.Sc. Medical Microbiology/Applied Microbiology/General Microbiology/Biotechnology/ Biochemistry with or without DMLT<br>Or<br>B.Sc. Microbiology/ Biotechnology/Biochemistry/Chemistry/Life Science with or without DMLT | ३८ वर्ष खुल्या करीता व ४३ वर्ष इतर मागासर्विय जाती करीता | २५०००/- |
| २ | पोषाहार तज्ञ (न्युट्रीशन ऑफिसर ) (पोषाहार विभाग-नागपूर करीता) | ०१ | सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर,माता कचेरी परीसर, श्रध्दानंदपेठ, नागपूर-४४०० २२ | विजा-अ-१ | BSC Nutrition, Home Science & Nutrition, पदव्युत्तर पदवी व MS-CIT, पोषाहार विभागाचा कामाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य | ४३ वर्ष व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास ६० वर्ष कमाल मार्यादा | २००००/- |

**राष्ट्रीय आरोग्य अभियान, उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर या कार्यालयांतर्गत येणाऱ्या रिक्त असणा-या पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करणेत येत आहे. सदर रिक्त पदासाठी अर्ज स्विकारण्याची मुदत दि. २७.०९.२०२३ पासुन ते दिनांक ०९.१०.२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजेपासुन ते ५.०० वाजेपर्यत (शनिवार व रविवार तसेच सुटटीचे दिवस वगळून) स्विकारण्यात येतील. तसेच दिनांक ०९.१०.२०२३ नंतर आलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. ई-मेलद्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्ज समक्ष अथवा रजिस्टर डाकेव्दारे/कुरियरने पाठवावे.**

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :-**

उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर , राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, उपसंचालक कार्यालय, आरोग्य सेवा, माता कचेरी परीसर, श्रध्दानंद पेठ, दिक्षाभूमीजवळ, नागपूर ४४००२२ या पत्त्यावर अर्ज करावा.

**१) दिनांक - अर्ज करण्याचे दिनांक २७.०९.२०२३ ते दिनांक ०९.१०.२०२३ पर्यंत**

**२) वेळ - १०.०० वाजेपासुन ते ५.०० वाजेपर्यत (शनिवार व रविवार तसेच सुटटीचे दिवस वगळून)**

## .टी व शर्ती -

१) उपरोक्त पदे ही ११ महिने २९ दिवस असे कंत्राटी तत्वावर कराराद्वारे भरणेत येत आहे. सन २०२४-२५ च्या कृती आराखडयामध्ये सदरच पदाची मंजुरी प्राप्त न झाल्यास वरील पदाची सेवा आपोआप संपुष्टात येईल. परंतु वरील पद सन २०२४-२५ मध्ये मंजुर झाल्यास पुढील ११ महिने २९ दिवसाची नियुक्ती समाधानकारक कार्यकालानंतर देण्यात येईल.

२) खुल्या प्रवर्गातील उमेदवांरासाठी रु १५०/- व राखील प्रवर्गातील उमेदवारांसाठी १००/- धनाकर्ष (Demand Draft ) जोडणे आवश्यक आहे. सदरचा धनाकर्ष (Demand Draft ) "Deputy Director Of Health Society Nagpur" या नावाने काढावा. धनाकर्ष (Demand Draft ) राष्ट्रीयकृत बॅंकेचा आसावा.

३) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकिय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत.

४) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

५) केंद्र/राज्य शासनाने संबंधित पद नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

६) सर्व पदांसाठी उमेदवारांनी सर्व शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, तसेच पदवीचे सर्व गुणपत्रक (पहिले वर्ष ते अंतिम वर्ष), पदवी प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वय अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणूण (१० व १२ वीचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (सांक्षाकिंत / स्वसांक्षाकिंत) जोडावीत.तसेच तांत्रिक स्वरुपाचे पद असल्यास त्यांचे संबंधित राज्यस्तरीय परीषदेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईज्ज ॲफिडेव्हीट जोडणे बंधनकारक राहील.

७) एकापेक्षा अधिक पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास उमेदवाराने स्वतंत्र अर्ज व धनाकर्ष सादर करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने कोणत्या पदासाठी अर्ज केला त्याचा उल्लेख सोबत जोडलेल्या अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

८) अनुभव :-

- शैक्षणिक अहता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अहर्ता प्राप्त केल्यानंतर फक्त शासकिय व निमशासकीय अनुभव ग्राहय धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अहर्ता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येणार नाही. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.
- अनुभवाचा तपशील नमूद करीता असतांना ज्या शासकीय व निमशासकीय कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे अशाच शासकीय व निमशासकीय कार्यालयाचा तपशील फॉर्म मध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.
- तत्सम पदाचा अनुभव प्रमाणपत्र सादर करतांना संस्थेचे लेटर हेड, जावक क्रं व अनुभव कालावधीचा स्वयंस्पष्ट उल्लेख करणे गरजेचे आहे, नसल्यास अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येणार नाही. नियुक्तीच्या आदेशाच्या आधारे गुण दिले जाणार नाहीत.

९) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१०) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

११) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा.

१२) सदर रिक्त पदांच्या संख्येत, तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे वा सदर पदभरती अंशतः किंवा पुर्ण रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड समिती तथा उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर मंडळ नागपूर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१३) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमदावाराची निवड रद्द करण्यात येईल.

१४) जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा अराखिव प्रवर्गासाठी ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील. तसेच एनएचएम अंतर्गत काम करीत असलेल्या उमेदवारांना ५ वर्षे वयोमर्यादा शिथिल राहील.

१५) उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवून गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

१६) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार निवड समितीकडे राखिव ठेवण्यात आलेले आहेत, याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१७) अर्जाचा नमुना हा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

१८) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश आपोआप संपुष्टात आणूण, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

१९) पात्र उमेदवारांना पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे गुण देण्यात येणार आहेत.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| **पदासाठी आवश्यक** Qualifying exam **मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे)** | **मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे** 50 **प्रमाणे** Proportion **काढावे. (उदा.** 60% **गुण प्राप्त असल्यास त्याचे** 50% **प्रमाणे** Proportion = 60*50/100=30) | 50 **गुण** |
| **पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.** | **अधिकतम** 20 **गुण द्यावेत.** **मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे** 20 **प्रमाणे** Proportion **काढावे (उदा.** 1. Staff Nurse **पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त** B.Sc (Nursing) **हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारांस** B.Sc (Nursing) **च्या अंतिम वर्षात** 60% **गुण प्राप्त असल्यास त्याचे** 20% **प्रमाणे** Proportion =60*20/100=12 **गुण)** | 20 **गुण** |
| **संबंधित पदाशी निगडीत अनुभव** | **प्रत्येक** 1 **वर्षासाठी** 6 **गुण द्यावेत.** (1 **वर्षाकरिता** 6 **गुण, जास्तीत जास्त** 30**गुण)** | 30 **गुण** |

- यानुसार गुणांकन केल्यावर गुणानुक्रमांनुसार अधिकतम गुण मिळालेल्या उमेदवारांची गूणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर यादीबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याकरीता पाच दिवसाची मुदत देण्यात येईल. आक्षेपासोबत त्यांच्या पृष्टयर्थ योग्य पुरावे सादर करण्यात यावे.
- ज्या पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे त्या पदाकरीता पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापुर्वी त्यांची कौशल्य चाचणी घेण्यात यईल. सदर कौशल्य चाचणीमध्ये सदर उमेदवार पात्र ठरल्यास त्यास नियुक्ती आदेश देण्यात येतील अन्यथा नाही.
- नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांना रुजु करुन घेण्यापुर्वी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे, शैक्षणिक अहर्ता प्रमाणपत्रे इतर आवश्यक कागदपत्रे यांची तपासणी व खात्री करण्याची जबाबदारी संबंधित संस्था प्रमुख यांची राहील.

२०) पदभरती बाबतीची अदयावत स्थिती उपसंचालक कार्यालय, नागपूर मंडळ, नागपूर तसेच वरील नमुद केलेल्या website (www.nrhm.maharashtra.gov.in & www.arogya.maharashtra.gov.in) वर कळविण्यात येईल.

**अध्यक्ष निवड समिती**
**तथा**
**उपसंचालक आरोग्य सेवा**
**नागपूर मंडळ, नागपूर**

## कंत्राटी पदाकरिता कार्यालयीन अर्जाचा नमुना

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर .

| पासपोर्ट आकाराचा अलीकडील छायाचित्र स्वता: साक्षांकित करुन लावावे करावा |
|---|

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र:-

प्रति,

पदाचे नाव: -------------------------------------

पद स्थापना कार्यक्षेत्र ............................

१) उमेदवारांचे संपूर्ण नांव :- ------------------------------------------------

२) उमेदवारांच्या वडिलांचे संपूर्ण नांव :- ------------------------------------------------

३) जन्म तारीख :- वर्ष .............. महिना .............. दिवस ............

अक्षरी ----------------------------------------

----------------------------------------

वय :- .......... वर्ष पुर्ण, ............महिने, ........ दिवस

(जाहिरात प्रसिध्द झाले त्या दिवशी )

४) राहण्याचा पत्ता :- ------------------------------------------------------

------------------------------------------------------

------------------------------------------------------

(मोबाईल क्र.:- ..............................................) (नमुद करणे अनिवार्य)

(ई मेल ID.:- ..................................................)

५) अर्जदार महाराष्ट्राचा रहिवाशी आहे काय ? :- होय/नाही

६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे :- होय/नाही जातीचा प्रवर्ग :- ------------------

जातीचे नाव :- ------------------

अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :- ------------------

(नमुद करणे अनिवार्य)

७) धनाकर्ष क्रमांक व दिनांक व रक्कम :- ..................................................

८) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही :- आहे/नाही

९) शैक्षणिक पात्रता :-

| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशील (सर्व) | बोर्ड/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१०) अनुभव :- अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी.

| अ. क्रं. | काम केलेलया कार्यालयांचे नांव व पत्ता | संस्थ्येचा प्रकार (शासकिय/निमशासकिय) | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वर्षे | महिने | दिवस |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

११) **अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत.** (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

१)........................................ २)........................................

३)........................................ ४)........................................

५)........................................ ६)........................................

७)........................................ ८)........................................

९)........................................ १०)........................................

१२) अर्जदार सेवानिवृत्त/स्वेच्छा निवृत्त आहे काय ? होय/नाही

असल्यास शासकिय सेवेत रुजु दिनांक ..................... पदनाम .................................

सेवानिवृत्त/स्वेच्छा निवृत्त दिनांक ............ सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन..........

सेवानिवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन) ..............

१२) वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा अणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असे ही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिति खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातील नमूद केलेलया सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

**ठिकाण :- नागपूर** **स्वाक्षरी :-** ........................................

**दिनांक :- / /२०२३** **अर्जदारांचे नांव:-** ---------------------------

# लहान कुटूबांचे प्रमाणपत्र -नमुना

मी श्री/श्रीमती/कुमारी----------------------------------------------------------------------------------------------------- श्री------
-------------------------------------------------------------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय----------- वर्ष, राहणार-----------------------------------------------------------------------यान्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

1) मी----------------------------------------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला -------------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 23 जुलै 2020 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या --------------- इतकी आहे. (असल्यास जन्म दिनांक 1) / / 2) / /

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 23 जुलै 2020 व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे शासकिय नियमानुसार मी या पदासाठी अपात्र ठरेल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण - अर्जदार स्वाक्षरी -

दिनांक- / / अर्जदाराचे नाव-